गोवादूत : पणजी - गुरुवार, दि. १८ सप्टेंबर २०१४

# नवनिर्माण महाविद्यालयातर्फे आपदग्रस्तांसाठी मदत फेरी

**दोडामार्ग, दि. १७ (प्रतिनिधी)**

दोडामार्ग येथील नवनिर्माण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने माळीण आपदग्रस्तांसाठी निधी जमा करण्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची दोडामार्ग बाजारपेठेमधून फेरी काढण्यात आली. या मदत फेरीत बाजारपेठेतील सर्व भाजी विक्रेते, दुकानदार, गाडेवाले आदी सर्व स्तरातील व्यक्तींनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. ही मदत फेरी यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी/विद्यार्थिनींनी राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख डॉ. एस. यु. दरेकर, प्रा. आर. ए. मोरे, प्रा. एस. एम. खडपकर, प्रा. डी. वाय. बर्वे, प्रा. डॉ. आर. एस. इंगळे, प्रा. डॉ. पी. डी. गाथाडे, प्रा. एस. एन. जाधव, प्रा. एम. टी. बेग, प्रा. एस. एस. पाडगावकर, प्रा. पी. एन. ढेपे आदींनी सहकार्य केले.